उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेसाठी अंध, मूकबधीर, बहुविकलांग व शारिरीक दृष्ट्या अपंग असलेल्या विद्यार्थ्यांप्रमाणे अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांना सवलती देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण विभाग
शासन निर्णय, क्रमांक: एसएससी १०९८/५७८७/[३१८/९८]/उमाशि-२.
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
दिनांक:- ८ जुलै, १९९९

पहा:- महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, शीवाजीनगर, पुणे यांचे पत्र क्र. रा. मं. /सभा-घटना/६३१३, दि. ७/१० १०. १९९८.

शासन निर्णय:- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ठ होणा-या अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांना इ. १० वी प्रमाणे सवलती इ. ११ वी व १२ वी करिता देण्यासंदर्भात प्रचलित महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ विनियम, १९७७ मधील पृष्ठ क्र. २११ वरील अनुक्रमांक ७ मध्ये दुरुस्ती करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

२. महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, अधिनियम, १९६५ मधील ~~नियम~~ कलम ३६[३] अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून सोबत जोडलेल्या महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ विनियम, १९७७ मधील पृष्ठ क्रमांक २११ वरील अनुक्रमांक ७ मध्ये दुरुस्ती करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ मो. दि. भांडारकर ]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, शिवाजीनगर, पुणे
विभागीय अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई/पुणे/नाशिक/कोल्हापूर/औरंगाबाद/अमरावती/नागपूर/लातूर
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई/पुणे/नाशिक/कोल्हापूर/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.
निवड नस्ती, उमाशि-२.